शिक्षण प्रसारक मंडळींचे

# रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय

## मराठी विभाग

दिनांक : २१ ऑगस्ट, २०१९

## मराठी विषय अभ्यासक्रम समिती बैठक

रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयाच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रम समितीची बैठक बुधवार, दिनांक २१ ऑगस्ट २०१९ रोजी महाविद्यलयामध्ये दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस मराठी विषय अभ्यासक्रम समितीचे सदस्य उपस्थित होते. या बैठकीत रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालयातील प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमावर चर्चा झाली. बैठकीत चर्चेला आलेले मुद्दे पुढीलप्रमाणे –

- उपस्थित सर्वच सभासदांचे स्वागत करून बैठकीस सुरुवात झाली. शैक्षणिक स्वातंत्र्य अधिक चांगल्यारितीने पुढील काळात कसे अंमलात आणता येईल याबद्दल अनेक स्वागतार्ह सूचना या बैठकीमध्ये करण्यात आल्या.
- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष - सत्र २, सत्र ४ आणि सत्र ६ मराठीच्या सत्रांत परीक्षेच्या प्रश्नपत्रिका सदस्यांना दाखविण्यात आल्या. त्याबद्दल त्यांचे मत विचारण्यात आले. त्यांनी प्रश्नपत्रिकांबाबत समाधान व्यक्त केले.
- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष मराठीच्या विद्यार्थ्यांना दिल्या गेलेल्या प्रकल्प विषयांबद्दल विभागातील अध्यापक शिल्पा नेवे आणि डॉ. लीना केदारे यांनी सविस्तर माहिती दिली.
- प्रकल्प विषयांमध्ये विद्यार्थ्यांचे सादरीकरण, तसेच गुगल क्लासरुमवर प्रकल्प स्वीकारण्याचा पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आला. याविषयी अभ्यासमंडळ सदस्यांनी आनंद व्यक्त केला.
- प्रकल्प विषय कल्पक असून त्यातून विद्यार्थ्यांना विषयाची समज मिळण्यासोबतच विषयातील स्वारस्य वाढण्यासही मदत होऊ शकते असे मत सदस्यांनी व्यक्त केले.
- २०१९ - २०२० हे शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यापासून मराठी विभाग व मराठी भाषा आणि वाङ्मय मंडळ यांनी घेतलेल्या उपक्रमांची माहिती देण्यात आली.
- 'नॅक' आणि IQAC यांच्याकडून आलेल्या सूचनेनुसार विभागातील माजी विद्यार्थ्यांची नोंद आणि त्यांची विविध कार्यक्षेत्रे याचे तपशील गोळा करण्यासाठी गुगल फॉर्म तयार करण्यात आला आहे. त्याची माहिती विभागातर्फे देण्यात आली.
- २०२० - २०२१ या शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रमात कोणकोणते बदल करावेत याविषयी सूचना करण्याची विनंती समितीला करण्यात आली.
- अंतर्गत मूल्यमापन परीक्षेकरिता बहुपर्यायी प्रश्नांचा वापर कोणकोणत्या विषयपत्रिकांना करण्यात येईल याबद्दल चर्चा झाली. अनिवार्य मराठी (प्रथम वर्ष कला), मराठी पेपर १ (द्वितीय वर्ष कला), मराठी पेपर १ आणि पेपर ३(तृतीय वर्ष कला) या विषयपत्रिकांना बहुपर्यायी वस्तुनिष्ठ प्रश्न विचारण्यास आणि संगणकीकृत परीक्षा घेण्यास अभ्यासमंडळ सदस्यांनी मंजुरी दिली. मात्र विद्यार्थ्यांना उत्तरे लिहिण्याचा सराव राहणे तेवढेच आवश्यक असल्यामुळे उर्वरित सर्व अभ्यासपत्रिकांमध्ये केवळ वस्तुनिष्ठ प्रश्न असू नयेत, तर मुख्य परीक्षेच्या दृष्टीने उत्तरे लिहिण्याचा सराव होऊ शकेल अशा प्रश्नांचा समावेश असावा अशी भूमिका अभ्यासमंडळ सदस्यांनी घेतली.

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE ESTD 1937 MUMBAI-19

Signature Not Verified
Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10

- तसेच प्रकल्पांमध्ये प्रकल्प लेखनाला ५ गुण, सादरीकरणला ५ गुण आणि मुलाखतीला (viva) ५ गुण आणि विद्यार्थ्यांची वर्गातील उपस्थिती व विभागातील क्रियाशील सहभाग यासाठी ५ गुण अशी विभागणी २० गुणांच्या प्रकल्पांमध्ये असावी, असे मत सदस्यांनी व्यक्त केले.
- शैक्षणिक वर्ष २०१९ - २०२० मधील सत्र १ ते सत्र ६ यासाठी नियुक्त केलेल्या मॉडरेटर्सची माहिती विभागप्रमुखांनी समितीस दिली. त्या नावांना सर्व समिती सदस्यांनी अनुमोदन दिले.
- बैठकीच्या अखेरीस सदस्यांचे आभार मानून बैठकीचे आमंत्रण देऊन बैठक संपन्न झाली.

**अभ्यासक्रम समिती सदस्य :**

**डॉ. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**प्रा. डॉ. अनिल सपकाळ (प्रमुख, मराठी विभाग, कुलगुरू नियुक्त सदस्य, मुंबई विद्यापीठ)**

**प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**डॉ. तुकाराम रोंगटे (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. प्रभाकर देसाई (विषयतज्ज्ञ)**

**मा. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**अनघा पेंडसे (माजी विद्यार्थी प्रतिनिधी)**

शिक्षण प्रसारक मंडळींचे

## रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय

**<u>मराठी विभाग उत्तरपत्रिका तपासणी मंडळ (Examiner and Moderator)</u>**

- डॉ. गीता मांजरेकर
- डॉ. सुर्यकांत आजगांवकर
- प्रा. अंजली दशपुत्रे
- डॉ. स्नेहा देऊस्कर

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE ESTD. 1937 MUMBAI-19

Signature Not Verified
Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10

- प्रा. वैशाली जावळेकर
- प्रा. शैलेश औटी
- प्रा. अभिजीत देशपांडे

**वरील मंडळास आमची संमती आहे :**

**डॉ. लीना केदारे (प्रमुख, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**प्रा. डॉ. अनिल सपकाळ (प्रमुख, मराठी विभाग, कुलगुरू नियुक्त सदस्य, मुंबई विद्यापीठ)**

**प्रा. शिल्पा नेवे (सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय)**

**डॉ. तुकाराम रोंगटे (विषयतज्ज्ञ)**

**डॉ. प्रभाकर देसाई (विषयतज्ज्ञ)**

**मा. राजीव खांडेकर (व्यावसायिक तज्ज्ञ)**

**अनघा पेंडसे (माजी विद्यार्थी प्रतिनिधी)**

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE ESTD 1937 MUMBAI-19

Lcedare

Signature Not Verified

Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE, MUMBAI-19

Dept. of Marathi

Minutes of the meeting of the Board of Studies

Date: **10th April 2020**

Time: **5:30 pm.**

Venue: **Skype (Online Video Conference Call)**

Members Present: **07**

| Sr. No. | Name | Signature |
|---|---|---|
| 1. | **Dr. Leena C. Kedare** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 2. | **Prof. Dr. Anil Sapkal** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 3. | **Shilpa Neve** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 4. | **Dr. Tukaram Rongate** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 5. | **Dr. Prabhakar Desai** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 6. | **Anagha Pendse** | **Skype (Online Video Conference Call)** |
| 7. | **Dr. Sucheta Ketkar** | **Skype (Online Video Conference Call)** |

**Agenda Item No. 1:** To revise and pass the syllabus for FY/SY/TY BA (both semesters) classes

**DISCUSSED THAT**

- प्रथम वर्ष कला शाखेच्या अनिवार्य मराठी या विषयपत्रिकेत यावर्षी कोणताही बदल करण्याचा विचार नाही.
- प्रथम वर्ष ऐच्छिक मराठीमधील 'जांभूळ आख्यान' या नाट्यकृतीच्या जागी 'डॉक्टर तुम्हीसुद्धा' हे नाटककार अजित दळवी लिखित नाटक नेमता येईल का याविषयी चर्चा करण्यात आली. सद्यःकालीन वैद्यकीय क्षेत्रातील अनिष्ट प्रवृत्तीं संदर्भात या नाटकात विवेचन असल्यामुळे विद्यार्थी वर्गास हे नाटक अधिक जिव्हाळ्याच्या विषयावरचे वाटू शकेल, असे मत सदस्यांनी व्यक्त केले. तसेच हे चांगले नाटक आहे असे सर्व सदस्यांचे मत पडले.
- द्वितीय वर्ष कला शाखेच्या दोन्ही विषयपत्रिका यावर्षी तशाच ठेवाव्यात अशी विनंती विभागप्रमुख डॉ.लीना केदारे यांनी अभ्यासमंडळ सदस्यांना केली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. १ आणि ३ यात कोणतेही बदल करू नयेत अशी विनंती मंडळास करण्यात आली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. २ मधील सत्र ५ आणि सत्र ६ यांच्या अभ्यासक्रमात समतोल निर्माण करण्याच्या दृष्टीने सत्र ५ मधील घटक २ चा काही भाग कमी करता येऊ शकेल का यासंदर्भात अभ्यासमंडळ सदस्यांचे मत घेण्यात आले. या अभ्यासपत्रिकेचा अभ्यासक्रम जवळपास १०० गुणांच्या तोडीचा असल्यामुळे हा थोडा भाग कमी करण्यास काहीच हरकत नाही, असे मत सर्व सदस्यांनी दिले. तसेच जो भाग कमी करायचा मानस मराठी विभागातर्फे व्यक्त करण्यात आला तो भाग एम.ए.च्या त्याच विषयाच्या अभ्यासक्रमात पुनरुक्त होत असल्यामुळे तो कमी करण्यास काहीच हरकत नाही अशीही चर्चा सर्व सदस्यांनी केली.

RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE ESTD. 1937 MUMBAI-19

Signature Not Verified
Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10

- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ४ या विषयपत्रिकेचे स्वरूप सत्र ५ मध्ये भाषाविज्ञानाचे ४ घटक आणि सत्र ६ मध्ये मराठी व्याकरणाचे ४ घटक असे आतापर्यंत होते. विद्यार्थी प्रतिसाद आणि इतर स्वायत्त महाविद्यालयातील तृतीय वर्ष मराठीच्या अभ्यासक्रमासंदर्भात तेथील अध्यापकांचे अनुभव ऐकता या अभ्यासपत्रिकेचे स्वरूप थोडे बदलण्याचे ठरले. अभ्यासपत्रिकेचे नाव 'भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण' असे करून दोन्ही सत्रांमध्ये २ घटक भाषाविज्ञानाचे आणि २ घटक मराठी व्याकरणाचे ठेवावेत अशी मांडणी झाली. तसेच याही अभ्यासपत्रिकेतील घटक विषयांचा आवाका १०० गुणांच्या आसपास असल्यामुळे या अभ्यासपत्रिकेतील 'अर्थविन्यास' हा घटक ६० गुणांच्या दृष्टीने कमी करण्याविषयी अभ्यासमंडळ सदस्यांची परवानगी मागण्यात आली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ५ मधील सत्र ६ अंतर्गत आतापर्यंत नेमलेल्या दोन कलाकृती बदलाव्या या अनुषंगाने चर्चा झाली. अभ्यासपत्रिकां क्र. ५ मधील सत्र ६ मधील 'उद्ध्वस्त धर्मशाळा' या नाटकाऐवजी चं.प्र.देशपांडे यांच्या 'ढोलताशे' या चर्चानाट्याची निवड अभ्यासमंडळाने करावी असे सुचविण्यात आले. तसेच इंदिरा संत यांच्या 'मृण्मयी' या कवितासंग्रहाऐवजी आता कवयित्री नीरजा यांचा 'स्त्रीगणेशा' हा काव्यसंग्रह नेमावा अशी सूचना डॉ. प्रभाकर देसाई यांनी केली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ६ मधील सत्र ६ अंतर्गत चित्रपट परीक्षण या घटक विषयासाठी गेल्या वर्षी नेमण्यात आलेला 'कोर्ट' हा चित्रपट बदलून दुसरा चित्रपट नेमण्यासंदर्भात बोलणे झाले. प्रा.डॉ.अनिल सपकाळ यांनी 'सामना' हा चित्रपट सुचवला.

**RESOLVED THAT**

- प्रथम वर्ष कला शाखेच्या अनिवार्य मराठी या विषयपत्रिकेत यावर्षी बदल न करण्यास अभ्यासमंडळ सदस्यांनी मंजुरी दिली.
- ऐच्छिक मराठी या अभ्यासपत्रिकेत 'डॉक्टर तुम्हीसुद्धा' हे अजित दळवींचे नाटक नेमण्यास परवानगी देण्यात आली.
- द्वितीय वर्ष कला शाखेच्या दोन्ही विषयपत्रिकांमध्ये बदल न करण्याची विभागाची विनंती अभ्यासमंडळ सदस्यांनी मान्य केली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. १ आणि ३ यात कोणतेही बदल करू नयेत या विनंतीसही अभ्यासमंडळाने अनुमती दिली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. २ मधील सत्र ५ अंतर्गत भारतीय साहित्यशास्त्रातील रससूत्राचे भाष्यकार लोल्लट, शंकूक, भट्टनायक यांचे सिद्धांत कमी करण्यास अभ्यासमंडळाने सहमती दर्शवली.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ४ या विषयपत्रिकेचे स्वरूप यापुढे 'भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरण' असे करून दोन्ही सत्रात भाषाविज्ञान आणि मराठी व्याकरणाचे प्रत्येक २ – २ घटक असे एकूण ४ घटक ठेवण्याचे निश्चित झाले.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ५ मधील सत्र ६ अंतर्गत चं.प्र.देशपांडे यांचे 'ढोलताशे' हे नाटक आणि कवयित्री नीरजा यांचा 'स्त्रीगणेशा' हा काव्यसंग्रह नेमण्यास अभ्यासमंडळाच्या सर्व सदस्यांनी अनुमोदन दिले.
- तृतीय वर्ष मराठी अभ्यासपत्रिका क्र. ६ मधील सत्र ६ अंतर्गत चित्रपट परीक्षण या घटक विषयासाठी या शैक्षणिक वर्षात 'सामना' चित्रपट नेमण्याचे निश्चित झाले.

**Agenda Item No. 2:** To decide on the changes in the modalities of assessment, if any, which includes the question paper pattern, for internal and external examination.

**DISCUSSED THAT**

- अंतर्गत मूल्यमापन आणि बहिर्गत मूल्यमापनाच्या पद्धतींची कल्पना अभ्यासमंडळ [illegible] देण्यात आली. तसेच सत्र १, ३ आणि ५ यांच्या सत्रांत परीक्षांच्या सर्व प्रश्नपत्रिका अभ्यासमंडळ

ESTD 1937 RAMNARAIN RUIA AUTONOMOUS COLLEGE MUMBAI-19

Signature Not Verified
Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10

सदस्यांना निरीक्षणासाठी ई-मेलद्वारे आधीच पाठविण्यात आल्या होत्या. त्या सर्व प्रश्नपत्रिका अभ्यासमंडळ सदस्यांनी पडताळून त्या नियमानुसार असल्याचा निर्वाळा सर्व सदस्यांनी दिला

**RESOLVED THAT**

- प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष आणि तृतीय वर्ष मराठीच्या सर्व विषयांच्या अंतर्गत आणि बहिर्गत मूल्यमापनाच्या पद्धतीमध्ये आणि प्रश्नपत्रिकांच्या स्वरुपामध्ये कोणताही बदल न करण्याचे ठरले.

**Resolution Agenda Item No. 3:** To approve the Certificate Courses with syllabi, duration, costing and evaluation, if any.

**DISCUSSED THAT**

- प्रमाणपत्र अभ्यासक्रमासंदर्भात पटकथा लेखन, चित्रपट रसास्वाद याप्रकारचे काही प्रमाणपत्र अभ्यासक्रम शक्य झाल्यास घेण्याचा मराठी विभागाचा मानस मराठी विभागप्रमुख डॉ. लीना केदारे यांनी व्यक्त केला. प्रमाणपत्र अभ्यासक्रमासंदर्भात त्याला शुल्क, विद्यार्थी प्रतिसाद आदी बाबी तपासून थोड्या नंतरच्या टप्प्यावरती त्याविषयी अधिक चर्चा करण्याचे ठरले. प्रमाणपत्र अभ्यासक्रमासंदर्भात सर्व तऱ्हेचे मार्गदर्शन आणि तज्ज्ञांचे संपर्क अशाप्रकारचे साहाय्य अभ्यासमंडळ सदस्य नक्की देतील असे आश्वासन डॉ. प्रभाकर देसाई आणि प्रा. डॉ. अनिल सपकाळ यांनी दिले.

**RESOLVED THAT**

- प्रमाणपत्र अभ्यासक्रमासंदर्भात त्यांच्या मार्गदर्शक सूचनांची वाट पाहावी असे ठरले.

**Agenda Item No. 4:** Any other matter with permission of the Chair

**DISCUSSED THAT – N.A.**

**RESOLVED THAT – N.A.**

**Dr. Leena C. Kedare**

**HOD, Marathi**

Signature Not Verified

Signed By:ANUSHREE SANJAY LOKUR
Reason:I attest to the accuracy and authenticity of this document
Location:
Signing Date:08.11.2024 14:10